आकाशवाणी नागपूर,

प्रादेशिक वृत्त विभाग

प्रादेशिक बातम्या (मराठी-वेळ सायंकाळी ०६.००)

सोमवार दिनांक ११ नोव्हेंबर २०२४

ठळक बातम्या

1. देशाचे एकावन्नावे सरन्याधीश म्हणून न्यायमूर्ती संजीव खन्ना यांनी आज स्वीकारला पदभार.
2. प्रमुख राजकीय पक्षांच्या बड्या नेत्यांकडून प्रचारसभांमध्ये मतदारांना आकर्षित करण्याचे प्रयत्न.
3. महाराष्ट्राला देशातील पहिल्या क्रमांकाचे विकसित राज्य बनविण्याचा भाजपचा संकल्प असल्याचं भाजपा विधानसभा निवडणूक संकल्प समितीचे सदस्य अनिल सोले यांचं प्रतिपादन.
4. केंद्रीय संचार ब्युरोच्या जिल्हास्तरीय मतदान जनजागृती कार्यक्रमासाठी मल्टिमिडीया व्हॅनचा शुभारंभ.

-----------------------------------------

न्यायमूर्ती संजीव खन्ना

न्यायमूर्ती संजीव खन्ना यांना राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांनी देशाच्या ५१ व्या सरन्यायाधीश पदाची शपथ दिली. सरन्यायाधीश खन्ना यांचा कार्यकाळ सहा महिन्यांचा म्हणजे १३ मे २०२५ पर्यंत राहणार आहे. डॉ.डी.वाय.चंद्रचूड निवृत्त झाल्याने त्यांच्या जागी खन्ना यांची नियुक्ती करण्यात आली आहे. शपथविधी सोहळ्याला पंतप्रधान नरेंद्र मोदी यांसह अन्य मान्यवर उपस्थित होते. कायदा आणि न्याय मंत्री अर्जुन राम मेघवाल आणि दिल्लीचे नायब राज्यपाल विनय कुमार सक्सेना यांनी सरन्यायाधीश खन्ना यांचं अभिनंदन केलं. सरन्यायाधीश संजीव खन्ना यांनी १९८३ मध्ये कायदे क्षेत्रातील कारकीर्दीला सुरुवात केली. घटनात्मक कायदा, कर, लवाद, व्यावसायिक कायदा आणि पर्यावरण कायदा यासह कायदेशीर क्षेत्रांत त्यांना मोठा अनुभव आहे. खन्ना यांनी प्राप्तिकर विभागाकरिता वकील म्हणूनही काम केलं आहे. न्यायमूर्ती खन्ना यांनी ४०० पेक्षा अधिक न्यायपीठांचा भाग म्हणून काम केलं आहे.

-----------------------------------------

प्रचार सभा

मतदान अवघ्या काही दिवसांवर आल्याने राजकीयपक्षांच्या प्रचारसभांना वेग आला आहे.

आज विदर्भात अनेक ठिकाणी प्रमुख नेत्यांच्या सभा झाल्या. राज्यातल्या शेतकऱ्यांच्या शेतमालाला हमीभाव मिळत नाही, मात्र भाजपाचे नेते ३७० कलमसारखे मुद्दे मांडून लोकांची दिशाभूल करत आहेत, अशी टीका माजी मुख्यमंत्री आणि शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाचे प्रमुख उद्धव ठाकरे यांनी केली. ते आज यवतमाळ जिल्हयातील वणी मतदारसंघात आयोजित प्रचारसभेत बोलत होते. मुंबईसह राज्यभरातले विविध प्रकल्प विशिष्ट उद्योगसमूहाला आंदण दिले जात असून भाजपा जातींमध्ये भांडण लावत असल्याचा आरोप ठाकरे यांनी केला. जुनी पेन्शन आणि सार्वत्रिक मोफत शिक्षण लागू करण्याचा त्यांनी पुनरुच्चार केला. -

*ज्या काही गोष्टी आपण देऊ इच्छित आहोत, जसं महिलांना सुरक्षा म्हणजे प्रत्येक ठिकाणी महाराष्ट्रमध्ये पोलीस स्टेशन एक वेगळं महिलांसाठी महिला पोलीस अधिकारी आणि महिला पोलीस शिपाई असलेलं पोलीस स्टेशन आपण उभारणार आहोत. शेतकऱ्यांचं नुकसान होऊ न देता जे जीवनावश्यक पाच वस्तू आहेत मग त्याच्यामध्ये गहू आला, तांदूळ आला, साखर, तेल, डाळ या जीवनावश्यक वस्तूंचे भाव आपण पुढची पाच वर्ष हे स्थिर ठेऊन दाखवणार. निवृत्त सरकारी जे कर्मचारी आहेत त्यांना जुनी पेन्शन योजना लागू करणार आहोत. त्याच्यानंतर ज्याप्रमाणे मुलींना मोफत शिक्षण दिलं जातं तसंच मोफत शिक्षण मी माझ्या महाराष्ट्रात जन्मलेल्या मुलांना सुद्धा देणार आहे.*

-----------------------------------------

दरम्यान, आपले भविष्य बदलायचे असेल तर भ्रष्टाचाराचा डाग नसलेल्या प्रामाणिक उमेदवाराला आणि पक्षाला निवडून द्या, असं आवाहन भाजपचे ज्येष्ठ नेते आणि केंद्रीय मंत्री नितीन गडकरी यांनी आज नागपूर जिल्हयातील काटोल मतदारसंघातील मतदारांना केलं. यावेळी काटोल मधल्या विकास कामांची माहिती त्यांनी दिली ते म्हणाले -

*भारतीय जनता पार्टीच्या सरकारने १० वर्ष पूर्ण केली. आणि या १० वर्षामध्ये महाराष्ट्रामध्ये, विदर्भामध्ये आणि या नागपूर जिल्ह्यामध्ये देखील अनेक कामं सरकारच्या माध्यमातून झाली आहे. माझ्या विभागातर्फे केवळ या मतदार संघामध्ये दोन हजार कोटी रुपयाची कामं जवळपास झाली आहे, मंजूर आहे आणि कामं सुरु आहे. काटोलपासून वरुडपर्यंत जाणाऱ्या रस्त्याकरिता एक आरोबी रेल्वे उड्डाणपूल आणि पुलाकरिता दीडशे कोटी रुपये मंजूर केलेले आहे त्याही कामाची सुरवात लगेच होणार आहे.*

काटोल आणि नरखेड इथं भाजप-महायुतीचे उमेदवार चरणसिंग ठाकूर यांच्या प्रचारार्थ गडकरी यांची जाहीर सभा झाली. यावेळी प्रदेशाध्यक्ष आमदार चंद्रशेखर

बावनकुळे, काटोलचे निवडणूक प्रभारी अविनाश ठाकरे यांची प्रमुख उपस्थिती होती.

------------------------------------------

उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी आज गोंदिया जिल्ह्यातील आमगाव देवरी इथं प्रचार सभेत महायुतीचे उमेदवार संजय पुराम यांना निवडून देण्याचं आवाहन केलं. या क्षेत्राचा विकास करण्यासाठी आपलं सरकार वचनबद्ध असल्याचं ते म्हणाले. तत्पूर्वी काल, अमरावती जिल्ह्यात धामणगावला भाजपा नेते आणि उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांची सभा झाली. 'पंधरा वर्षाच्या तुलनेत अडीच वर्षात प्रताप अडसड यांनी २ हजार ३०० कोटीची विकास कामे केली, असं ते म्हणाले.

------------------------------------------

कॉंग्रेससह महाविकास आघाडीचा जाहीरनामा फसवा असून त्यावर कुणीही विश्वास ठेवणार नाही. मतांकरीता कॉंग्रेस खोटारडेपणा करीत असल्याची टीका भारतीय जनता पार्टीचे प्रदेशाध्यक्ष चंद्रशेखर बावनकुळे यांनी केली आहे. नागपूर इथं ते माध्यमांच्या प्रतिनिधींशी बोलत होते. कामठी मतदारसंघातील भाजपा-महायुती उमेदवार चंद्रशेखर बावनकुळे यांनी काल बेसा-पिपळा नगर पंचायत क्षेत्रात प्रचार केला.

------------------------------------------

दरम्यान, अनेक वर्ष प्रलंबित असलेल्या कामांना पूर्णत्वास आणण्याचे काम आपण केले. पश्चिम नागपुरातील प्रत्येक प्रभागात सिमेंट रस्ते, डांबरीकरण, खडीकरण, विद्‌युत खांब, विद्‌युत दिवे, आयब्लॉक, ड्रेनेज वॉटर अशी कामे करण्यात आली. विकास कामे करताना आपण कधीही जात-पात धर्म पंथ याचा विचार केला नाही. त्यामुळे मतदारांचा आपल्यावरील विश्वास आणखीनच दृढ झाला आहे, असं प्रतिपादन पश्चिम नागपुरचे विद्‌यमान आमदार, नागपूर जिल्हा कॉँग्रेस कमिटीचे अध्यक्ष विकास ठाकरे यांनी केलं . काल सायंकाळी जन-आशीर्वाद यात्रेदरम्यान सुरेंद्रगढ भवानी माता मंदिरात एका सभेत ठाकरे बोलत होते.

------------------------------------------

महाराष्ट्रातील सध्याचे सरकार हे फसवे आहे, अशी टीका छत्तीसगडचे माजी मुख्यमंत्री भूपेश बघेल यांनी केली. गडचिरोली जिल्ह्यातील आरमोरी विधानसभा क्षेत्राचे महाविकास आघाडीचे उमेदवार रामदास मसराम यांच्या प्रचारार्थ कोरची इथं आयोजित जाहीर सभेत ते बोलत होते.याप्रसंगी विधानसभेतील विरोधी पक्षनेते विजय वडेटटीवार,खा.डॉ. नामदेव किरसान उपस्थित होते.

------------------------------------------

विधानसभेच्या निवडणुकीत भाजपाला पराभव दिसू लागल्याने ते हिंदू-मुस्लीम करत आहे. भाजपचे नेते भाषणात महागाई, बेरोजगारी, शेतकरी यांच्याबद्दल बोलत नाहीत. 'बटेंगे तो कटेंगे', 'एक हैं तो सेफ हैं', च्या घोषणा देऊन जनतेची दिशाभूल करत आहेत, त्याला बळी पडू नका. जातीधर्मात फूट पाडणाऱ्या भाजपा युतीला सत्तेतून तडीपार करा, असं आवाहन काँग्रेस प्रदेशाध्यक्ष नाना पटोले यांनी केलं . यवतमाळ जिल्ह्यातील उमरखेड महागाव विधानसभा मतदारसंघाचे महविकासाघडीचे उमेदवार साहेबराव दत्तराव कांबळे यांच्या प्रचारासाठी घेतलेल्या सभेत नाना पटोले बोलत होते.

-----------------------------------------

अनिल सोले पत्रपरिषद

महाराष्ट्राला देशातील पहिल्या क्रमांकाचे विकसित राज्य बनविण्याचा भारतीय जनता पक्षाचा संकल्प असून राज्याची अर्थव्यवस्था १ट्रिलीयन डॉलर्सपर्यंत पोहोचविण्यासाठी गतिमान विकास हे भाजपचे ध्येय आहे, असं प्रतिपादन भाजपचे माजी आमदार आणि **2024** विधानसभा निवडणूक संकल्प समितिचे सदस्य अनिल सोले यांनी आज नागपूरात भाजप मीडीया केंद्रात घेतलेल्या पत्रकार परिषदेत स्पष्ट केलं. विधानसभा निवडणुकीनिमित्त भाजपच्या संकल्पपत्राचं प्रकाशन केंद्रीय गृहमंत्री अमित शाह याच्या हस्ते काल मुंबईत झालं. पक्षाच्या संकल्प पत्राची माहिती देण्यासाठी या पत्रकार परिषदचं आयोजन करण्यात आलं होतं. समाजाच्या सर्व घटकांचा विचार करून तयार केलेले हे संकल्प पत्र राज्याच्या जनतेचे आकांक्षा पत्र आहे, असंही सोले यांनी नमूद केलं. या संकल्पपत्रासाठी सामान्य नागरिकांकडून सूचना मागविण्यात आल्या होत्या. ८७७ गावांतून ई मेल, पत्रे आली. ८ हजार ९३५ सूचना आल्या. संकल्प पत्रातील एकेक मुद्द्यांच्या आधारे त्यांची अंमलबजावणी करण्यासाठी समिती नेमली जाईल, अशी माहिती त्यांनी दिली. विकसित भारतासाठी विकसित महाराष्ट्र तयार करण्याचा आमचा संकल्प या संकल्प पत्रातून स्पष्ट झाला असून आहे पंतप्रधान नरेंद्र मोदींची स्वप्ने प्रत्यक्षात आणण्याचे काम या संकल्प पत्रातून होत आहे, असं ते म्हणाले. महाराष्ट्राची सुजाण जनताही या संकल्पांच्या पूर्ततेसाठी महायुती सोबत राहील असा विश्वास सोले यांनी व्यक्त केला.

-----------------------------------------

मतदार जनजागृती

विधानसभा सार्वत्रिक निवडणूकीसाठी **20** नोव्हेंबर रोजी मतदान होणार असून सर्वांनी मतदान करून लोकशाहीच्या उत्सवात सहभागी व्हावे, असं आवाहन वर्ध्याचे जिल्हाधिकारी तथा जिल्हा निवडणूक अधिकारी राहुल कर्डीले यांनी

मतदारांना केलं. मतदानाची टक्केवारी वाढविण्यासाठी भारत निवडणूक आयोग, माहिती व प्रसारण मंत्रालय भारत सरकार यांच्यावतीने केंद्रीय संचार ब्यूरो,वर्धा, आणि जिल्हा निवडणूक अधिकारी कार्यालय वर्धा, यांच्यामार्फत जिल्ह्यातील चारही मतदार संघासाठी करण्यात येणा-या मतदार जनजागृती मल्टिमिडीया व्हॅनचा शुभारंभ कर्डीले यांच्या हस्ते करण्यात आला, त्यावेळी ते बोलत होते. त्याचप्रमाणे सेंट्रल ब्युरो ऑफ कम्युनिकेशन, नागपूर तर्फे देखील नागपूरचे जिल्हाधिकारी आणि जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी यांच्या हस्ते मतदार जनजागृती व्हॅनचा प्रारंभ करण्यात आला."CBC ची प्रसिद्धी व्हॅन, कमी मतदान असलेल्या बूथला लक्ष्य करेल आणि मतदारांची संख्या वाढवण्यात महत्त्वाची भूमिका बजावेल," असं जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी विनायक महामुनी म्हणाले...

*केंद्रीय संचार ब्युरो आणि डिस्ट्रिक्ट ऍडमिनिस्ट्रेशन यांच्या वतीने हा निवडणुकीचा जो प्रचार रथ आज सुरू केलेला आहे. त्यामध्ये एलईडी व्हॅन लागलेली आहे, तसेच आपले महाराष्ट्रीयन पद्धतीचे जे पोवाळे आहेत. त्याद्वारे जनजागृती करण्यात येत आहे. आम्ही यासाठी नागपूर जिल्ह्यामध्ये मागील लोकसभेमध्ये तसेच 2019 च्या विधानसभेमध्ये 10% जे सगळ्यात शेवटचे मतदान केंद्र आहेत, जिथे सगळ्यात कमी मतदान झालेल आहे त्या मतदान केंद्राचा रूट मॅप बनवलेला आहे. आणि या व्हॅनतर्फे जे जनजागृती होईल, त्यामुळे निश्चितच मतदानाचा टक्का वाढण्यास मदत होईल. त्यामुळे नागपूरकरांना अशी विनंती आहे, आपण लाखोंच्या संख्येने मतदान करून मिशन डिस्टिंगशन जे आपलं आहे, 75 टक्के मतदान व्हायला हवा आहे. तर त्यामध्ये नागपूरकर आपण पास होऊ नागपूरकर वोटकर.*

---

हवामान

विदर्भात थंडीची किंचित चाहूल लगायला सुरवात झाली असून सकाळच्या सुमारास वातावरणात गारवा जाणवत आहे. दरम्यान, गेल्या 24 तासात गोंदिया इथं 16. 8 सेल्सिएस इतक्या किमान तापमानाची नोंद करण्यात आली असून त्यावर त्या पाठोपाठ चंद्रपूर आणि गडचिरोली जिल्ह्यात देखील 17 अंश सेल्सिअस इतकं किमान तापमान नोंदवण्यात आलं. नागपुरात 17.6 इतक्या किमान तापमानाची नोंद झाली आहे. सर्वाधिक कमाल तापमान वाशिम जिल्ह्यात 34. 2 इतकं नोंदवण्यात आलं आहे.

---